**० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील,अकोले, नगर व पारनेर तालुक्यातील एकूण ११ को.प. बंधारे योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.**

**महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ**
**औरंगाबाद - ४३१००१**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ निर्णय क्र. ज.सं.यो./प्र.मा./प्र.क्र. ६०७१ /१०३१
दिनांक : ०९ मे, २०२२.

**संदर्भ :**

१) अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे, कार्यालयाचे पत्र क्र. प्रशा-२ / १४३०, दिनांक : २१.०४.२०२२

२) शासन, जलसंपदा विभाग, परिपत्रक क्र. संकिर्ण-२००६ / (२६९/२००६) / जसंअ, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक : २५.०४.२०१९.

**प्रस्तावना :**

अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे, यांचे संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये, ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील,अकोले, नगर व पारनेर तालुक्यातील एकूण ११ को.प. बंधारे योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबतचे प्रस्ताव महामंडळास सादर करण्यात आले आहेत.

शासन, जलसंपदा विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकानुसार, साठवण क्षमता ३.५० द.ल.घ.फु. (१०० स.घ.मी.) पेक्षा जास्त नसलेल्या योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार, अहमदनगर जिल्ह्यातील,अकोले, नगर व पारनेर तालुक्यातील एकूण ११ को.प. बंधारे योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब महामंडळाच्या विचाराधीन होती.

**महामंडळ निर्णय :**

० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील,अकोले, नगर व पारनेर तालुक्यातील एकूण ११ को.प. बंधारे योजनांच्या, मृद व जलसंधारण विभागाच्या सन २०२०-२१ च्या दरसूचीवर आधारित कामाप्रित्यर्थ रु.११६७०९०१५/- (रुपये अकरा कोटी सदुसष्ट लक्ष नऊ हजार पंधरा फक्त) व अनुषंगिक खर्च रु.७११२६५१/- (रुपये एकाहत्तर लक्ष बारा हजार सहाशे एकावन्न फक्त) अशा एकूण अंदाजित रु.१२३८२१६६६/- (रुपये बारा कोटी अडतीस लक्ष एकवीस हजार सहाशे सहासष्ट फक्त) किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सोबत परिशिष्ट-०१ मध्ये योजनांची यादी व गोषवारा जोडण्यात आलेला आहे.

सदर योजनांच्या प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकानुसार एकूण साठवण क्षमता ७२५.७५ स.घ.मी. असून, नियोजित एकूण सिंचन क्षमता २८५ हेक्टर इतकी आहे.

सदर योजनांच्या कामावरील खर्च, हा महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधीतून केला जाईल.

तसेच सदर योजनेस खालील अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) शासन निर्णय दिनांक ३१ जुलै, २००० अन्वये या योजनेसाठी लाभधारकांची पाणी वापर संस्था स्थापन करणे अनिवार्य राहील. पाणी वापर संस्थेमार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी हस्तांतर करण्यास सहमती असल्याबाबत संबंधीत ग्रामसभेच्या ठरावाद्वारे मान्यता घेणे आवश्यक आहे.

२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक : नागरी-२०११ / प्र.क्र.१९२ / निधी / जल-१, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१२ अन्वये विहित तरतूदींचे पालन करण्यात यावे.

(क्र.मा.प.....)

३) शासन, मृद व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.गेटेड-२०१८/प्र.क्र.२७५/जल-१, मंत्रालय, मुंबई-०३२, दिनांक ०५.१२.२०१८ अन्वये, भाग A मध्ये नमुद नविन का.प.बंधारे/गेटेड साठवण बंधारे यामध्ये १ ते २ मी. उंची पर्यंत संधानकीय पडदीसह बांधकाम करण्यासंदर्भात दिलेल्या मार्गदर्शक सूचना व क्षेत्रीय परिस्थितीनुसार आवश्यक कार्यवाही प्राधान्याने करावी.

४) शासन, जलसंपदा विभाग, परिपत्रक क्र.संकीर्ण-२००६/(२६९/२००६)/जसंअ, मंत्रालय, मुंबई-०३२, दिनांक २५.०४.२०१९ नुसार प्रस्तावित योजनेची साठवण क्षमता ३.५० द.ल.घ.फू. (१०० स.घ.मी.) पेक्षा जास्त नसून, योजनेच्या प्रस्तावित स्थळी योजनेच्या साठ्यानुसार पाणी उपलब्ध होत आहे, परिपत्रकातील मुद्दा क्र.३ चे अनुषंगाने, प्रस्तावित योजना / प्रकल्पामुळे जायकवाडी प्रकल्पाचे पाणीसाठ्यावर कोणताही परिणाम होत नाही, तेसच या परिपत्रकातील शेवटच्या परिच्छेदातील मुद्दा क्र.३ नुसार सुचित केल्याप्रमाणे मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे उल्लंघन होणार नाही, याबाबत खात्री करण्यात यावी. वरील सर्व बाबींची संपूर्ण जबाबदारी सर्व क्षेत्रीय अधिकारी, उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा जलसंधारण अधिकारी, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांची आहे, याची नोंद घ्यावी.

५) प्रचलित शासन निर्णय, नियम, मार्गदर्शक सूचना व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन योजनेच्या कामाची निविदा कार्यवाही करावी व प्राप्त निविदा मंजुरीसाठी महामंडळास सादर करावी.

६) कामे पूर्ण करुन योजना देखभाल दुरुस्तीसाठी नियमानुसार हस्तांतरीत करावी.

सदर योजनेच्या कामावरील खर्च खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

**लेखाशिर्ष :**

मागणी क्रमांक - झेडएच - ५
प्रधान लेखा शिर्ष ४४०२, मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च,
१९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणुका,
(०१) भागभंडवली अंशदान (०१) (०१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाला भाग भांडवली अंशदान,
(४४०२ २८२३), ३२, अंशदाने (दत्तमत) (योजनांतर्गत)

सदर महामंडळ निर्णय, कार्यकारी समितीच्या दिनांक ०५.०५.२०२२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील विषय क्र. ०४ अन्वये पारित ठरावाच्या अनुषंगाने, महामंडळाचे पत्र क्र.मजसंम/तांशा-३ / का.स.बै.०५.०५.२२ कार्यवृत्त/ ९१८/ सह / २०२२, दिनांक : ०६.०५.२०२२ अन्वये, निर्गमित केलेल्या कार्यवृत्तानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सोबत :- परिशिष्ट - ०१

**(सु. पां. कुशिरे)**
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ
औरंगाबाद.

**प्रतिलिपी - परिशिष्ट - ०१ सह.**

१) मा. सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई - ४०० ०३२.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई - ४०० ०३२.
५) स्वीय सहाय्यक, मा. राज्यमंत्री, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई - ४०० ०३२.
६) अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे - [illegible].
   सोबत - वरीलप्रमाणे अंदाजपत्रक.
७) प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक.
८) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अहमदनगर.
९) महामंडळ कार्यालय, लेखा शाखा क्र.१
१०) महामंडळ कार्यालय-संग्रहार्थ.

परिशिष्ट - ०१

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ निर्णय क्र. ज.सं.यो./प्र.मा./प्र.क्र. ६०७१ / १०३९ दिनांक : ०९ मे, २०२२. चे सहपत्र

० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील,अकोले, नगर व पारनेर तालुक्यातील एकूण ११ को.प. बंधारे योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.

| अ.क्र | योजनेचा प्रकार | योजनेचे नाव | तालुका | जिल्हा | कामाप्रित्य खर्च (रुपये) | अनुषंगिक खर्च (रुपये) | एकुण अंदाजित किंमत (रुपये) | साठवण क्षमता (स.घ.मी.) | जलसाठा किंमत/ स.घ.मी. | प्रचलित मापदंड/ स.घ.मी. | लाभ व्यय गुणोत्तर | आर्थिक परतावा दर | सिंचन क्षमता (हे.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | को.प.बं. | को.प.ब. येसरठाव (दराडे वस्ती) | अकोले | अहमदनगर | ७८७७८७१ | ७८७७८७ | ८६६५६५८ | ५६.४४ | १५३५३८ | १७८८१० | १.६२ | १९.२७ | २२ |
| २ | को.प.बं. | को.प.ब. खेतेवाडी (जांभुळ डोह) | अकोले | अहमदनगर | ८९७२७६५ | ८९७२७७ | ९८७००४२ | ६३.६० | १५५१८९ | १७८८१० | १.६२ | १९ | २५ |
| ३ | को.प.बं. | को.प.ब.खेतेवाडी (याहाळ डोह) | अकोले | अहमदनगर | ९१७३३७४ | ९१७३३७ | १००९०७११ | ६५.६६ | १५३६८१ | १७८८१० | १.६५ | १९.२४ | २६ |
| ४ | को.प.बं. | को.प.ब.अकोळनेर जाधववाडी (स्मशान भुमी जवळ) | नगर | अहमदनगर | ११७२०८२३ | ५८३०४१ | १२३०३८६४ | ७०.३० | १७५०१९ | १७८८१० | १.१७ | १६.४ | २८ |
| ५ | को.प.बं. | को.प.ब.बाबुर्डी घुमट | नगर | अहमदनगर | ६९१९०४७ | ३४२९५२ | ७२६१९९९ | ४०.९२ | १७७४६८ | १७८८१० | १.१७ | १६.४४ | १६ |
| ६ | को.प.बं. | को.प.ब.वाघुंडे खुर्द (दत्त मंदिर) | पारनेर | अहमदनगर | ९४६४४१७ | ४७०२२१ | ९९३४६३८ | ५६.५७ | १७५६१७ | १७८८१० | १.१८ | १६.२५ | २२ |
| ७ | को.प.बं. | को.प.ब.निघोज (ढवणवाडी) | पारनेर | अहमदनगर | १२२८९९२८ | ६११४९६ | १२९०१४२४ | ७३.३६ | १७५८६५ | १७८८१० | १.१९ | १६.२४ | २९ |
| ८ | को.प.बं. | को.प.ब.राळेगण थेरपाळ (अंधारी अमराई) | पारनेर | अहमदनगर | १०७०८०६७ | ५३२४०३ | ११२४०४७० | ६४.०२ | १७५५७७ | १७८८१० | १.१८ | १६.३३ | २५ |
| ९ | को.प.बं. | को.प.ब.वाघुडे बुद्रुक (दिवटे मळा) | पारनेर | अहमदनगर | ९४३३११६ | ४६८६५६ | ९९०१७७२ | ५५.९७ | १७६९१२ | १७८८१० | १.१८ | १६.२५ | २२ |
| १० | को.प.बं. | को.प.ब.देवी भोयरे (नागझिरे वस्ती) | पारनेर | अहमदनगर | १४७६०१९५ | ७३५०१० | १५४९५२०५ | ८७.४० | १७७२११ | १७८८१० | १.१७ | ३४ | ३४ |
| ११ | को.प.बं. | को.प.ब.निघोज (मुका मळा) | पारनेर | अहमदनगर | १५३८९४१२ | ७६६४७१ | १६१५५८८३ | ९१.५१ | १७६५४८ | १७८८१० | १.१८ | १६.३३ | ३६ |
| | | **एकुण** | **११** | **योजना** | **११६७०९०१५** | **७११२६५१** | **१२३८२१६६६** | **७२५.७५** | | | | | **२८५** |

**(सु. पां. कुशिरे)**
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ
औरंगाबाद